# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक, गडचिरोली
दिनांक- ०७ /०९/२०१८

## गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम भागात रंगणार कबड्डी स्पर्धा

*गडचिरोलीतील अतिदुर्गम भागातील खेळाडुंना मिळणार प्रोत्साहन*

मा. पोलीस अधिक्षक गडचिरोली मा. शैलेश बलकवडे सा़े. यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली जिल्हयात वीर बाबुराव शेडमाके कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. गडचिरोली जिल्हा हा अतिदुर्गम, आदिवासी बहुल जिल्हा असून आदिवासींची स्वतंत्र अशी संस्कृती येथे नांदत आहे. त्या संस्कृतीला उभारी देण्यासाठी व आदिवासींच्या अंगीकृत असलेल्या विविध कलागुणांना वाव व संधी प्राप्त करुन देण्यासाठी गडचिरोली पोलीस विभागामार्फत संपूर्ण गडचिरोली जिल्हयामध्ये गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने या भव्य कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेची सुरवात ९ सप्टेंबर ते ११ सप्टेंबर २०१८ दरम्यान होणार आहे.

कबड्डी हा गडचिरोली जिल्ह्यातील जनतेचा आवडता खेळ असुन दुर्गम भागातील जनता ही सणासुदीच्या काळामध्ये गाव पातळीवर कबड्डी स्पर्धा आयोजित करुन करमणुक करीत असतात. परंतु त्याचे सुप्तावस्थेतील कौशल्य जनसामान्यापर्यंत पोहचवण्यासाठी कोणतेही माध्यम नाही, ही बाब ओळखुन गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने जनजागरण मेळावे व इतर कार्यक्रमादरम्यान विविध स्पर्धेचे आयोजन केले जाते. मागील वर्षापासुन पोस्टे/उपपोस्टे/पोमके, पोलीस उपविभाग व जिल्हास्तरावर नृत्य स्पर्धा, व्हॉलीबॉल स्पर्धा इत्यादीचे आयोजन करुन अतिदुर्गम भागातील हौशी खेळाडुंना संधी उपलब्ध करुन देण्यात आली होती. यावर्षी कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असुन पोस्टे/उपपोस्टे/पोमके स्तरावरील विजेत्या ३ संघाना अनुक्रमे प्रथम बक्षिस रु. ३,०००/-, व्दितीय बक्षिस रु. २,०००/- व तृतीय बक्षिस रु. १,०००/- रोख, असे पारितोषिक मान्यवरांच्या हस्ते देवून गौरविण्यात येणार आहे. तसेच पोस्टे स्तरावरील विजेत्या संघाना, उपविभाग स्तरावर व उपविभाग स्तरावरील विजेत्या संघाना जिल्हा स्तरावर खेळण्याची संधी मिळणार आहे. तरी जास्तीत जास्त खेळाडुंनी यास्पर्धेत सहभागी होण्यासाठी व अधिक माहितीसाठी आपले जवळचे पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी याचेशी संपर्क साधावा. असे आवाहन गडचिरोली पोलीस दलाच्यावतीने करण्यात येत आहे.